# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | FEBRUARY 2024 | No. 01


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**स्तोत्र ११२:१-१०**

१) परमेश्वराचें स्तवन करा. जो मनुष्य परमेश्वराचें भय धरितो आणि ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे तो धन्य!

२) त्याची संतति पृथ्वीवर पराक्रमी होईल; सात्विकांचा वंश आशीर्वादयुक्त होईल.

३) धनसंपदा त्याच्या घरी असते; त्याचे नीतिमत्व सर्वकाळ राहते.

४) सात्विक जनांस अंधकारांत सूर्यप्रकाश प्राप्त होतो; त्याच्या ठायी कृपा, दया व न्याय ही ओतप्रोत आहेत.

५) जो मनुष्य दया करितो व उसनें देतो त्यांचे कल्याण होते; तो न्यायसभेत आपल्या वादाचें समर्थन करील.

६) तो कधीहि ढळणार नाही; धार्मिकाचें स्मरण सर्वकाळ राहते.

७) तो वाईट बातमीला भिणार नाही; त्यांचे मन परमेश्वरावर भाव ठेवून अढळ राहते.

८) त्याचे मन स्थिर असते; आपल्या शत्रूंची गति आपल्या इच्छेप्रमाणे झालेली पाहीपर्यंत तो डगमगणार नाही.

९) त्याने सढळ हातानें गरिबांस दानधर्म केला आहे; त्याची धार्मिकता सर्वकाळ राहील. त्याचे शिंग गौरवयुक्त होऊन उन्नत होते.

१०) हे पाहून दुर्जन खिन्न होतील; ते दांतओठ चावतील पण विरघळून जातील; दुर्जनांची इच्छा नष्ट होईल.

# देवाचा हात तुमच्या भल्याकरिता तुमच्यांवर आहे

**GOD'S HAND IS UPON YOU FOR GOOD!**


मानद प्रमुख संपादक रेव्ह ॲन्जेलीन सेल्वाकुमारी


**माझ्या देवाचा वरदहस्त मजवर आहे..... (नहेम्या २:१८)**



देवाचा वरदहस्त हा विचार गुप्त कारस्थान करणे प्रगट करतो. बायबलच्या भाषांतरात ''देवाचा वरदहस्त'' हे क्रियाविशेषण एकूण ३९ वेळा, ३६ वेळा जुन्या करारात आणि ३ वेळा नव्या करारात पहावयास मिळते. आणखीन ''देवाचां हात'' हे क्रियाविशेषण बायबलमध्ये एकूण १६ वेळा, ७ वेळा जुन्या करारात, आणि ९ वेळा नवीन करारात पहावयास मिळते.

देवाचा वरदहस्त या शब्दास केवळ जुन्या कराराच्या काळातच महत्व होते असे नाहि; तर आज देखील आहे. आपल्या जीवनात देवाच्या वरदहस्तास इतके महत्व असल्याचे काय कारण आहे?

प्रे.कृ. ७:५० हे वेचन सांगते सर्व वस्तु त्याच्या हाताने केल्या गेल्या आहेत.


(...पान ३ वर)





एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल**

**पास्टर सॅम सेल्वा राज**

**यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**


इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

## "परत येत असतां. नदीच्या दोन्ही तीरांवर बहुत झाडे असलेली मी पाहिली" - यहेज्केल ४७:७

येशू ख्रिस्तामधील प्रिय मित्रांनो,

आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या, येशू ख्रिस्ताच्या नामात हार्दिक शुभेच्छा!

**एको ऑफ हिज कॉल**च्या बहुविविध कार्याकरिता तुमच्या अथक प्रार्थना आणि पाठबळाबद्दल तुम्हाला मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. तुमच्या समर्पितपणाबद्दल देवाकडून तुम्हांला निश्चितच प्रतिफळ प्राप्त होईल.



*सेन्ट पॉलस् मेट्रीक्युलेशन शाळेचे शिक्षक - ख्रिसमस गीत गाताना*

या सणाच्या दिवसात (ख्रिसमस, नूतन वर्ष आणि शब्बाथशाळेच्या वार्षिक कार्यक्रम) आम्ही संतोषपुरम, बालाजी नगर, वेलाचेरी आणि इतर काही ठिकाणी सुवार्ता प्रसार सभा आयोजीत केल्या होत्या. देवाने अनेकांच्या अंत:करणाला स्पर्श केल्यामुळे, उत्तम प्रतीसाद प्राप्त झाला. नवीन वर्षात आयोजीत केलेल्या सर्व कार्यक्रमांकरिता प्रार्थना करीत रहा अशी विनंती करीत आहोत.

तुम्हा सर्वांना कळविण्यास आनंद होत आहे, कि Asia Theological Association (ATA) द्वारे आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**ला अधिकृत मान्यता मिळण्याची प्रकीया सुरु आहे. या प्रक्रीयेच्या पूर्ततेकरिता तुमच्या प्रार्थना अपेक्षित आहेत. आम्हाला **नहेम्या बायबल कॉलेज**च्या



*ख्रिसमस सणात आपले वरिष्ठ पाळक - कार्यक्षेत्रात*

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development



*मान्यता प्राप्त करणाऱ्या टीम सोबत आपले पाळक*

ग्रंथालयाकरिता हिन्दी थियॉलॉजीकल पुस्तकांची गरज आहे. या संबंधात तुम्हाला ती कोठे प्राप्त होऊ शकतील अशी माहिती असल्यास फार मोठा आधार होईल.

मागील वर्षाकडे मागे वळून पाहाताना, आमच्या काही सेवेतील सहकाऱ्यांना प्रकृति स्वास्थाला सामोरे जावे लागले प्रार्थनेच्या सामर्थ्या द्वारे देवाने कांहीना आरोग्य दान दिले; आणि आणखी काहीजण्णांना तुमच्या प्रार्थनेच्या आधाराची गरज आहे.

आम्ही सेवेत पुढे-पुढे जात असताना तुमच्या सततच्या प्रार्थनांची अपेक्षा करीत आहोत. आम्ही देखील तुम्हा सर्वांची प्रार्थनेत आठवण करीत आहोत याची खात्री बाळगा. कृतज्ञता आणि आशीर्वादासहित,

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

याबेद याला याचा अर्थ ठाऊक होता; त्यामुळेच त्याने म्हटले. ''तुझा वरदहस्त मजबरेबर असणार.'' आपल्या प्रत्येक कार्यक्रमात आणि जीवनातील प्रत्येक भागात देवाचा हात आपल्या सोबत असल्यास एक मोठा लक्षणीयबदल घडेल. आपणापैकी कितीजण हे बोलू शकतील?

✲ ''माझे दिवस तुझ्या हाती आहेत.'' (स्तोत्र ३१:१५)

✲ आम्ही देवाच्या हातचे काम आहोत. (स्तोत्र १३८:८)

✲ आपला प्राण त्याच्या हाती आहे. (दानीएल ५:२३)

✲ अंतरिक्ष त्याची हस्तकृति आहे. (स्तोत्र १९:१)

''माझे हात देवाच्या हातात देवून जेव्हा तुम्ही आणि मी आपले हात एकत्र धरले तर लक्षणिय बदल घडेल.''

देवाचा हात काय करु शकतो अशा कांहि गोष्टिंचा गंभीरपणे विचार करुया.

## १) निर्माण करणारा हात :-

देवाचा हात हा निर्मितीचा हात आहे. तो अस्तीत्वात नसलेल्या गोष्टि निर्माण करु शकतो. ''**जे नाही त्यास ते असल्यासारखी आज्ञा करितो.**'' (रोम ४:१७). त्याचा हात नवीन गोष्टि निर्माण करु शकतात. तो केवळ निर्माणकर्ताच आहे. असे नाहि, तर त्याचा हात मृत झालेल्या गोष्टि जीवित करु शकतो. त्याचा हात जेव्हा मृतावस्थेतील गोष्टिंस, निर्जीव किंवा भविष्य नसल्यासारख्या दिसणाऱ्या गोष्टिंना स्पर्श करितो, तेव्हा त्यांना पुन:जीवित करु शकतो. पुनर्नजीवित करुन त्यांची भरभराट करु शकतो. हे त्याच्या हाताचे सामर्थ्य आहे. नायीन गावातील विधवेच्या मुलाला त्याने स्पर्श केला तेव्हा तो जीवंत झाला. त्याने केवळ तिच्या मुलालाच जीवंत केले असे नाहि तर तिच्या जीवनांतील मृतावस्थेतील परिस्थिती पुर्नजीवीत करुन तिची आशा, आनंद आणि विश्वास पुर्नस्थापीत केला.

त्याच्या स्पर्शाने तिच्या आस्तित्वाला एक वेगळा अर्थ प्राप्त झाला आणि जीवनाला नवीन उद्देश प्राप्त झाला. त्याने जवळ जाऊन तिरडीस स्पर्श केला; तेव्हा खांदेकरी उभे राहिले. आणि तो म्हणाला, ''**मुला, मी तुला सांगतो, ऊठ.'' आश्चर्यकारकरित्या तो मेलेला उठून बसला व बोलू लागला. मग त्याने त्याला त्याच्या आईच्या हवाली केले.**'' (लूक ७:१४-१५).

आपण अद्याप या वर्षाच्या सुरवातीतच असल्यामुळे, पुढील दिवसांतील आवाहनांबद्दल अनिश्चितता वाटणे स्वाभाविक आहे. तुम्ही अगदी शेवटच्या टोकाला सामोरे जात आहात; आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आहे कां? किंवा पुढे काय करावयाचे अशा विचारात असाल. आजपर्यंत केवळ एक महिना सरला आहे, सध्याच्या कार्यक्रमांना कदाचीत उरलेल्या महिन्याची काळजी लागली असेल. कशा रितीने मी सर्व हाताळणार?

प्रिय मित्रांनो, आपल्या जीवनातील मृतावस्थेतील भागामध्ये देवाला त्याचे जीवन घालू देवूया. ते शुक्श आणि निरुपयोगी आहे हे कबूल करा आणि देवाला त्यांचा स्विकार करण्यास परवानगी द्या. या प्रक्रियेत सखोल आत्मचिंतनाची आणि सत्यतेची जाणीव होण्याची गरज आहे.

## २) समाधान देणारा/इच्छापूरी करणारा हात

**(स्तोत्र १४५:१६)**

''तूं आपली मूठ उघडून सर्व प्राणिमात्रांची इच्छा पुरी करितोस.'' (स्तोत्र १४५:१६).

देवाचा हात इच्छापूर्तीचे उगमस्थान आहे. ''**तो आपले भय धरणाऱ्यांची इच्छा पुरवितो.**'' (स्तोत्र १४५:१९) त्यात अधिक स्तोत्र ३७:४. **मनोरथ पूर्ण करण्याचे आश्वास देतो.** हे वाचतो तेव्हा अनेकवेळा देवाने आपले प्रत्येक मनोरथ पूरे करावेत अशी अपेक्षा करित असतो. आणि ते प्राप्त झाले नाहित तर नाऊमेद होतो. खचून जातो आणि मग देवाने त्याचा शब्द पाळीला नाहि अशी तक्रार

करावयाची इच्छा होते.

प्रिय मित्रांनो हे वचन वाचत असताना देव आमची गरज पुवितो, परंतु जे त्याचे भय धरितात त्यांची हे आपणास समजणे आवश्यक आहे. कारण त्याचे भय बाळगणाऱ्यांची इच्छा त्याच्या इच्छेशी जुळणारी असते. इस्त्राएल लोकांना देवाने मिसर देशांतून बाहेर काढले, तेव्हा त्यांनी मांस खाण्याची व्यक्त केली. मला वाटते त्यांच्या अन्नाच्या बाबतची आवड माझ्या सारखीच होती. मासांहाराशिवाय अन्नसेवन करणे, माझ्या करिता आवाहन असते. मला मांसाहारी पदार्थ खुप आवडतात. इस्त्राएली लोक जरी स्वर्गीय मान्ना खाऊन समाधानी नव्हते, तरी देखील देवाने त्यांची इच्छा पुर्ण केली. तद्वतच, देवाला आपली इच्छा सर्वतोपरी पूर्ण करण्यात आनंद वाटतो, परंतु ते समाधान जे त्याचे भय धरण्यात आनंद मानितात आणि त्यांचे मार्ग त्याच्या हातात समर्पित करितात. कारण तसे करण्यात त्यांच्या विचारात एकता असणार जी व्यक्ति परमेश्वराचे भय धरिते ती नेहमीच देवाचे मन आणि इच्छा जाणून घेत असते.

तुम्ही जर तुमच्या स्थितीत तृप्त असाल, तर तुम्ही तुमच्या जीवनातील त्याच्या समाधान देणाऱ्या/इच्छा पूर्ण करणाऱ्या हाताविषयी साक्ष द्याल.

## ३) आधार देणारा/सावरणारा हात

### भीती नाही

**''परमेश्वर मनुष्याची गति स्थिर करितो, आणि त्याचा आयुष्यक्रम त्याला प्रिय आहे. तो पडला तरी सपशेल पडणार नाही; कारण परमेश्वर त्याला हात देऊन सावरील.''** (स्तोत्र ३७:२३-२४).

नितीमान अडखळत असताना देवाचा हात त्यांना सावरतो. **''तूं भिऊ नको, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ति देतो; मी तुझे सहाय्यहि करितो; मी आपल्या धार्मिकतेच्या उजव्या हाताने तुला सावरितो... कारण मी परमेश्वर तुझा देव तुझा उजवा हात धरुन म्हणत आहे कीं, भिऊ नको, मी तुझे साहाय्य करितो.''** (यशया ४१:१०,१३).

मी माझ्या तरुणपणातील एक समय आठवते, जेव्हा मी माझ्या वडिलांसोबत दक्षिण भारतातील नागरकोईल या ठिकाणी सेवाकार्यासाठी गेले होते. परतीच्या प्रवास, हा ६०० कि.मी.चा होता; आणि एका समुद्रावरील कि नदिवरील पुलावरुन जात होता. विजांच्या कडकडाट आणि वादळासह मुसळधार पर्जन्यवृष्टी होत होती आमची बस पुलावरुन पुढे जात असताना पुल हालत असल्याचे जाणवत होते आणि समुद्रनदिचे पाणी उंच उसळत होते. मी अतीशय भ्याले होते. अशा स्थितीत एका उबदार हाताने माझा हात धरलेला मला जाणवले. तो माझ्या वडीलांचा हात होता. आणि तो मजसाठी त्या स्थितीत पुरेसा होता. त्याची पकड जणू मला सांगत होती, ''भिऊ नको, मी तुजबरोबर आहे. तुला कांहि अपाय होणार नाही.'' माझ्या वडीलांना ते शब्द उच्चारावे लागले नाहीत, परंतु त्यांची पकडच मला त्यांची जाणीव करुन देत होती. आणि माझी भीती नाहिशी झाली.

प्रिय मित्रांनो, ''मी आपल्या हाताने तुला सावरितो.'' हे वचन मी वाचले, तेव्हा ते मला आठवण करुन देते कि परमेश्वर त्याच्या सामर्थी हाताने सावरितो, त्यामुळे मला चिंता करण्याची गरज नाही. आपला हात कोण धरित आहे याची खात्री करुन घ्या. बुद्धिसामर्थ्याच्यापलिकडे असलेली शांती असेल. तीच शांती पौल व सिलास यांनी फटके खाऊन जखमी झालेले असताना, हात-पाय साखळ्यांनी बांधलेले असताना, अघटीत असे घडण्याची वाट पहात असताना अनुभविली. तीच शांती त्या इब्रीबंधुनी अग्नीच्या भट्टीत फिरताना अनुभविली. जो पर्यंत आपल्या हातांनी देवाचे सामर्थी हात धरलेले असतील, आपण कोठेही जाऊ शकतो. स्तोत्रकर्ता म्हणतो, **''मृत्युच्छायेच्या दरीतूनहि मी जात असलो तरी अरिष्टांस भिणार नाही.''** (स्तोत्र २३:४). मी प्रार्थना करीते, की या वर्षातील पुढील सर्व महिन्यांतून कोणत्याही

(...पान ६ वर)

नहेम्याह बाइबल कॉलेज
रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 54 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

Certificate in Ministry
Diploma in Theology

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

Contact : The Chairman, Nehemiah Bible College.
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२४ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

**१९ फेब्रुवारी** : आपल्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवरील देवाच्या दयेबद्दल.

**२० फेब्रुवारी** : आपल्या **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलच्या माध्यमातून संपर्कात न आलेल्या विविध भाषिक लोकांपर्यंत पोहचण्याकरिता आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२१ फेब्रुवारी** : आपल्या **एको ऑफ हिज कॉल** मासिकाच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२२ फेब्रुवारी** : आमच्या कर्मचारी वर्गावर आशीर्वादांची विपुल वृष्टि केल्याबद्दल.

**२३ फेब्रुवारी** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये मासिक छापून ते सर्व मिशन क्षेत्रांपर्यंत पोहचविणे आम्हाला शक्य होऊ दिल्याबद्दल.

**२४ फेब्रुवारी** : आमच्या पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या **बायबल** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमात** वाढ झाल्याबद्दल.

**२५ फेब्रुवारी** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांतील रविवारच्या भक्तिमधील देवाच्या वचनातील सामर्थ्याबद्दल.

**२६ फेब्रुवारी** : आमच्या भागीदाराच्याद्वारे आम्हाला आधार आणि आर्थिक सहाय्याद्वारे आशीर्वादीत केल्याबद्दल.

**२७ फेब्रुवारी** : सर्व दुष्ट शक्तिंपासून आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वाराज व त्यांच्या कुटुंबियांचे रक्षणकरित असल्याबद्दल.

**२८ फेब्रुवारी** : आमच्या सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज आणि पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमावरील आशीर्वादाबद्दल.

**२९ फेब्रुवारी** : मागील महिन्यातील सर्व गरजा पुरविल्याबद्दल

**०१ मार्च** : **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यातील स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांचे रक्षण करित असल्याबद्दल.

**०२ मार्च** : तरुणांना मंडळीच्या सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यास आशीर्वाद देत असल्याबद्दल.

**०३ मार्च** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**च्या प्रिन्सिपल, शिक्षक आणि इतर कर्मचारी वर्गाला आशीर्वाद दिल्याबद्दल.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ मार्च** : सर्व राष्ट्रांत ऐक्य आणि शांती असावी.

**०५ मार्च** : आमच्या सर्व भागीदार आणि राज्य समन्वयकांकरिता.

**०६ मार्च** : भारतातील संपर्कात न आलेल्या सर्व ठिकाणी शुभवर्तमान गाजविणे शक्य व्हावे.

**०७ मार्च** : आमच्या सर्व सेवा कार्यक्रमांकरिता.

**०८ मार्च** : देवाने या महिन्यांतील आमच्या सर्व गरजा पुरवाव्यात.

**०९ मार्च** : इंग्रजी मासिकाच्या सहसंपादिका, बहिण साजीनी चेरियन इच्या प्रकृति स्वास्थाकरिता.

**१० मार्च** : भिन्न प्रकारच्या नवीन कोविडपासून सर्व देशांना दैवी संरक्षण प्राप्त व्हावे.

**११ मार्च** : सर्व देशांतील तरुण वर्ग आणि लेकरांनी येशू ख्रिस्ताचा त्यांचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार करावा.

**१२ मार्च** : आमच्या वरिष्ठ पाळक त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यशस्वी व्हावेत.

**१३ मार्च** : वृद्धाश्रमांतील सर्व वृद्धांकरिता.

**१४ मार्च** : जगभरातील सर्व लेकरांचे, तरुणांचे संगणकांशी जोडलेल्या खेळाच्या व्यसनात गुंतुन न जाण्यापासून रक्षण व्हावे.

**१५ मार्च** : आमच्या मासिकाच्या सहसंपादकांकरिता व त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**१६ मार्च** : सर्व देशांची आर्थिक परिस्थिती सुधरावी व आशीर्वादीत व्हावेत.

**१७ मार्च** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वाराज व त्यांच्या कुटुंबियांचे सर्व दुष्ट शक्तिंपासून रक्षण व्हावे.

**१८ मार्च** : जगभरातील सर्व मिशनरी सेवकांच्या रक्षणाकरिता.

(पान ४ वरुन)

परिस्थितीला सामोरे जात असताना देवाने तुमचा हात धरलेला आहे हे समजुन, त्या सर्वांतून पार जाण्यास शक्ति पुरवो.

या प्रवासात तुम्ही एकटे नाहीत. ज्याला आपला गेलेला दिवस, आजचा दिवस आणि उद्या (भूत/वर्तमान/भविष्य काळ) ठाऊक आहे, असा तो आपल्या सोबत आहे. तो आपल्या उद्यांमध्ये होत आला, त्यामुळे पुढे काय घडणार याची आपण चिंता करु नये. तो जर मला सोबत घेतो तर मला बाहेरही आणील!

## ४) शक्तिशाली/सामर्थी हात

त्याचा हात सामर्थ्यशाली आहे. तुमच्या बाजुला राहून तो विजय देवू शकतो किंवा तो तुमच्या विरुद्ध लढेल.

यशया १९:३६ वचन सांगते - **''त्याकाळी लोक बायकांसारखे होतील, सेनाधीश परमेश्वर त्यांजवर आपला हात उगारील त्यामुळे ते थरथर कांपतील व भयभीत होतील.''**

देवाच्या हाताच्या विरोधात कोणीही उभे राहू शकत नाही! खात्री करुन घ्या की तो तुमच्या विरुद्ध नाहि! जो देव आपल्या बाजुने आहे, आपण सुरक्षित आहोत, परंतु जर तो विरुद्ध असेल तर आपण शुन्य होणार.

## देवाचा हात केव्हा आपल्या विरुद्ध होतो?

प्रे.कृ. १३:८-११ हि वचने आपल्याला अलीम जादुगर याची गोष्ट सांगत आहे.

फितवावयाचा प्रयत्न केला. तेव्हा पौल म्हणाला, **''पाहा आता प्रभूचा हात तुला प्रतिकूल आहे, तूं अंधळा होशील, व कांही वेळपर्यंत सूर्य तुला दिसणार नाही. त्याक्षणीच धुकें व अंधार त्याजवर पडला.''** देवाचा सामर्थ्यशाली हात शुभवर्तमानाच्या शत्रूंचा न्याय करितो.

आपण देवाच्या कार्याला विरोध करितो, त्याचे कार्य थांबावे यासाठी बोलतो तेव्हा देवाचा हात आपल्या विरुद्ध येतो. देवाच्या लोकांच्या विरोधात बोलू नका; संदेश पाठवित जाऊ नका. अफवा पसरविणे थांबवा. देवाच्या कार्याच्या किंवा त्याच्या सेवकाच्या विरोधात बोलू नका. देवाला ते हाताळू द्या.

आपणा पैकी काहीजण अंधकारात जीवन जगत आहेत. कारण आपण देवाच्या कार्यात अडथळा झालेलो आहोत, त्यामुळे त्याने आमचे डोळे आंधळे केले आहेत. आज विचार करु या की माझ्या कृतिंद्वारे, शब्दांद्वारे, काही केल्यामुळे किंवा न केल्यामुळे देवाच्या कार्यात अडथळा निर्माण झाला आहे? आपण काळजी घेतली पाहिजे, अन्यथा देवाचा हात विरुद्ध होईल.

देवाचा हात आपल्या बाजूने असल्यास तो आपल्याला विजय देतो. ''**परमेश्वराचे गुणगान नवे गीत गाऊन करा कारण त्याने अद्भुत कृत्ये केली आहेत, त्याच्या उजव्या हातानें, त्याच्या पवित्र भुजानें तारण साधिले आहे.**'' (स्तोत्र ९८:१).

देवाच्या प्रिय सेवकांनो, कदाचीत काही वेळा मार्ग एकाकी असेल, दूर पल्याचा आणि चढावाचा असेल. तुम्हांला असे वाटते कां, तुमच्या द्वारे परिश्रमपूर्वक करीत असलेले कार्याची कोणालाही किंमत नाहि? तुमच्या पाठीवरील व्रण लोकांना कदाचित दिसणार नाहीत, परंतु येशू त्याच मार्गाने गेलेला आहे. त्याला नाकारण्यात आले, टिका करण्यात आली, चेष्ठा केली गेली, निराश केले गेले आणि एकटे सोडेले गेले. विसरु नका तुम्हाला पाचारण करणारा विश्वसनिय आहे! तो तुम्हाला ओळखतो आणि तो तुमच्याकरिता लढेल. तुम्ही मात्र स्थिर उभे राहा! आपल्या सर्व लढाया आपल्याकरिता लढणारा असा आपला देव आहे! त्याला पराजय मुळात ठाऊकच नाही! आपला देव सामर्थ्यशाली योद्धा आहे. जो त्याच्या सामर्थी हाताने आपल्याकरिता लढतो, त्यामुळे आपण विजय अनुभवतो.

## ५) आकार देणारा हात :-

शेवटि, परमेश्वराचा हात हा आकार देणारा हात आहे. तो कुंभार आणि आपण माति आहोत. तोच आम्हाला आकार देतो, कधी साफसूफ करुन, कधी शुद्ध करुन आणि काहीवेळा न आवडणारे ते करुन,

(...पान ९ वर)


# नहेम्या बाईबल निवासी कॉलेज

**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

माध्यम : तमिळ

**अभ्यासक्रम डिप्लोमा इन थियॉलॉजी/सर्टिफिकेट अभ्यासक्रम (ATA)**

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**ईश्वरविद्या सर्टीफिकेट**

**ईश्वरविद्या डिप्लोमा**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

प्रवेशा करिता त्वरा करा !

**संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**

**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १८. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| १९. | शिष्यत्त्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २०. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २१. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २२. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २३. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २४. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २५. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २६. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २७. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| २८. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| २९. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## तुम्हाला शंभरपट मिळेल आणि सार्वकालिक जीवनाचा वारसा मिळेल

**“जे कांही काम तुझ्या हाती पडेल ते आपले सगळे सामर्थ्य खर्चून कर;”... जो वारा पाहत राहतो तो पेरणी करणार नाही. जो मेघांचा रंग पाहत बसता तो कापणी करणार नाही.” (उपदेशक : ९:१०, ११:१४)**

बायबलमधील गहन सत्ये, पत्रव्यवहारा द्वारे, अभ्यासक्रमकरुन आणि बायबल कॉलेजच्या मांध्यमातून विविध विश्वासातील लोकांना शिकावीत अशी अनेक वर्षांपासून माझी इच्छा होती. हि इच्छा माझ्या अंत:करणात, खोलवर मुळावली होती, आणि दिवसेंदिवस अनेक वर्षे वाढत चालली होती. मी अतिशय धडपड करीत होतो, की मला याकरिता अर्थसहाय्य किंवा कोणीतरी मला मार्गदर्शन करणारे मिळावेत. या समयात मी आणि माझे कुटुंबिय गरिब अवस्थेत आणि अेनक गरजामध्ये कोणत्याही प्रकारची सुविधा नसलेल्या एका छोट्याशा घरात रहात होतो.

१९८० साली मला India Bible Litreture या संस्थेकडून एक सुवार्ता पाकीट प्राप्त झाले. त्यामध्ये कांही सुवार्ता पत्रिका, आणि पत्रव्यवहाराद्वारे शास्त्राभ्यास करण्याचे पुस्तक आढळले. या शुभवर्तमान पत्रिकांचा आणि पुस्तकाचा अभ्यास केल्यानंतर, त्याचा उपयोग भारतातील विविध भाषांतील लोकांना ते शिकविण्यास उपयोग करण्याची उत्सुकता लागली. मी त्या विचाराने प्रेरीत होऊन, माझ्या जुन्या सायकल वर बसून थावझन लाईटस्, चेन्नाई-६. या ठिकाणी असलेल्या इंडीया बायबल लिटरेचरच्या कार्यालयात गेलो.

तेथे मी मिसटर बेलू, ज्यांना मिस्टर वेलायुथम देखील म्हणत त्यांना भेटलो (सध्या ते एक्टीक्युटिव्ह डायरेक्टर आहेत) अतिशय दक्षतेने अभ्यासक्रमाचे पुस्तक पाठविण्या करिता बांधत असलेले पाहुन; त्याच्या शेजारी बसून तसेच करण्याची प्रेरणा मिळाली.

कौतुकाने त्यांच्याकडे पहात, मी सावकाश त्यांच्या जवळ गेलो व त्यांना विचारले कि, ते मला कांहि पुस्तके देवू शकतील कां? त्यांनी मला एक प्रतिची किंमत ५० पैसे आहे असे सांगितले. मी त्यांना सांगितले कि मी एक अतिशय कमी पगारात सरकारी नोकरी करीत असून गरीब स्थितीत रहात आहे. हे ऐकून त्यांनी मला विनामुल्य १० पुस्तके दिली. असमाधानाने मी बाहेर आलो आणि खिडकीतून त्या खोलीतील पुस्तकांकडे बारीक नजरेने पाहात राहिलो. मला वाटू लागले की, जणू त्यामधील काही पुस्तके मला बोलावित आहेत, जणूकाही अगदी वैयक्तिक संबंध असल्याप्रमाणे, विनंवीत होती, की मी त्यांना घेऊन जावे आणि माझ्या काही ओळखीच्या लोकांना ती द्यावीत कारण त्यात प्रभावित करण्याचे सामर्थ्य आहे. मला त्या जागेतून निघण्याची इच्छा होत नव्हती. अचानक, एक व्यक्ति आली, आणि मला म्हणाली “आमच्या या कार्यालयाच्या बाहेर उभा राहून बऱ्याच वेळेपासून खिडकीतून आत काय पहात आहेस? तू कोण आहेस? मी त्याला समजावून सांगितले, मी एक अतिशय कमी आवक असलेली परंतु जीवंत देव, येशू ख्रिस्त याची सेवा करणयची उत्कट इच्छा बाळगून असलेली व्यक्ति आहे. आणि मला हि पुस्तके प्राप्त करण्याची इच्छा आहे. त्यावर त्याने मला म्हटले जा आणि पैसे घेऊन ये आणि पुस्तके खरेदी कर. मी ते ऐकून विचार केला, माझी एकूलती एक मालमत्ता - माझी जुनी सायकल ती मी विकावी.

तत्परतेने मी जवळच असलेल्या सायकल दुरुस्तीच्या दुकानात गेलो आणि १०० रुपयांस माझी सायकल विकली व जाऊन पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची २०० पुस्तके विकत घेतली. माझे वाहून नेण्याचे साधन मी विकल्यामुळे मला थावझन लाईटपासून माझ्या घरापर्यंतचे ५ कि.मी अंतर सर्व पुस्तके खांद्यावर - डोक्यावर घेऊन चालतच जावे लागले. वाटेत दोनदा ती पुस्तके डोक्यावरुन - खांद्यावरुन रस्त्यावर पडली. मी थकलो होतो आणि मला अगदी असहाय वाटू लागले. माझी धडपड पाहून लोक माझा उपहास करीत असलेले दिसले. सरतेशेवटी मी घरी पोंहचलो आणि सर्व शक्तिनीशी पुस्तके वाटण्यास सुरुवात केली.

बंधु एम्. पॉलराज, यांच्या मदतीने मी "New Life For You!" हा शास्त्राभ्यास सुरु करु शकलो आणि त्या सोबतच **एको ऑफ हिज कॉल** सायंकालीन बायबल कॉलेज स्थापन केले.

होय, माझ्या प्रिय मित्रांनो, एक समय असा होता, की देवराज्याकरिता मला माझी जुनी सायकल विकावी लागली होती. ती माझी कृति माझ्या मित्रांसाठी आणि नातेवाईकांकरिता ती लज्जास्पद, अज्ञानी आणि मुर्खपणाची गणली गेली. परंतु आज देवाने मला कार आणि सहकाऱ्याकरिता योग्य सहकारी पुरवून आशीर्वादीत केले आहे.

त्यावेळी मला शुभवर्तमान पुस्तके खांद्यावर-डोक्यावर ठेवून न्यावी लागत होती. माझ्या तरुणपणात तो मजकरिता अपमान आणि खेदजनक अनुभव होता. परंतु आता, देवाने मला शुभवर्तमान साहित्य निरनिराळ्या ठिकाणी नेण्याकरिता वाहन मिनी बस आणि स्टाफ सहकारी पुरविलेत.

प्रिय मित्रांनो, देवाची तुमच्या करीता आणि भविष्यातील जीवनाकरिता देखील योजना आहे. तुमच्याकडे अद्याप वेळ आहे. तुम्ही देवाला एखादी गोष्ट समर्पित केली, तुम्हांला विपुल आशीर्वाद प्राप्त होतील. तुम्ही ख्रिस्ताला तुमचा आदर्श ठरवून देवराज्या विषयीचे विचार मनात बाळगून सेवा कार्याकरिता एखादी महत्वाची गुंतवणूक करण्याची निवड करु शकता. तुमच्या जीवनात देवाच्या आशीर्वादांना अंत नसणार.

**लक्षात ठेवा :-**

**केवळ एकच जीवन; ते लवकर सरणार;**

**ख्रिस्ताकरिता केलेले; ते टिकणार!**

*******

## Kind Attention: Echo of His Call Readers

Our 5 minute **Echo of His Call** YouTube messages are being broadcasted from 2.00 A.M. in Tamil, Telugu, English and Hindi (everyday). You can receive the Grace of God by watching the messages.

Moreover, save my mobile numbers (+91) 98410 71858, (+91) 98412 71858 (personal) in your mobile phones.

- Pr. S. Sam Selva Raj

(पान ६ वरुन)

अशासाठी की स्वामीसाठी उपयुक्त बनावे.

देव आम्हाला जेव्हा आकार देतो, तेव्हा तो सुखदायक अनुभव बसतो. त्याने आम्ही दु:खी होते आणि असहाय वाटते. परंतु अशावेळी आपण त्याच्या अगाध चातुर्यावर-सुज्ञतेवर भरोसा ठेवून स्वत:स त्याच्या स्वाधीन केले पाहिजे. एक गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की देवाला उत्तम ते कळते.

आम्हाला आकार देण्याकरिता देव आमच्या जीवनात परिस्थिती आणि प्रसंग येऊ देतो. लोकांचा देखील आकार देण्यास उपयोग करितो. काही लोक आपल्या जीवनात त्यांच्या दुष्टपणाद्वारे, रागावण्याद्वारे आणि त्यांच्या टोचून बोलण्याद्वारे आम्हाला संयम-सहनशीलता शिकवितात. देव काहीजणांना आपले चारित्र्य सुधारण्याकरिता आणतो. मर्यादित समयाकरिता आम्हाला साफसूफ करण्याकरिता काहीजण येतात, आणि देवाने घालून दिलेल्या लक्षापर्यंत आपण पोहचताच ते निघून आपल्याला सोडून जातात. काहीवेळा लोक आपल्याला एक कायमचा व्रण सोडून गेल्यामुळे विलाप करितो. लोक काही समयापुरते आपल्या जीवनात येत असतात. काहीजण जीवनाच्या पहिल्या पाना पुरतेच, काही पहिल्या अध्यायापुरते, आणि फारच थोडके जण आयुष्याच्या शेवटच्या गोष्टीपर्यंत असतात. त्यामुळे काहीजण तुमच्या जीवनातून निघून गेले तरी भक्कम रहा! कारण ते घडण्या मागचे कारण देवाला ठाऊक असते.

काहीवेळा देवाचा हात आपल्याला चिरडून टाकत आहे असे वाटत असते. ते आपल्या नाश व्हावा यासाठी नाही तर आपल्याला आकार देण्याकरिता.

१ पेत्र ५:६ वचन असे म्हणते - "**यास्तव देवाच्या हाताखाली लीन व्हा; यासाठी की त्याने योग्य वेळी तुम्हांस उंच करावे.**" आपल्या जीवनात तो किती सामर्थ्यशाली ठरु शकतो ते पाहू या!

आपण आपले जीवन, इच्छा, स्वप्ने देवाच्या सामर्थ्यशाली हाताखाली स्वाधीन केल्या, तर वरील सर्व आशीर्वाद घडून येतील.

*******


## URGENT

We require approximately 1000 Hindi Christian books for **our Nehemiah Bible Colleges**. Kindly inform us about the possibility of obtaining theological Hindi books.

**Please stop sending books in English and Tamil languages.** Thank you.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

## URGENT NEED

**PRINCIPAL & TEACHERS**

**for**

**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**

**An *Echo of His Call* Institution**

**Vijayanagaram, Medavakkam, Chennai - 100.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christians.

Apply with Bio-data to
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

## WANTED for

**NEHEMIAH BIBLE COLLEGE of ECHO OF HIS CALL, Chennai**
(ATA - Registered Candidate for Membership)

**DEAN (Residential):**
Hindi Theologian with M.Div. / M.Th. Degree & experience. Boarding, Lodging and Salary will be paid.
Eligible candidates may send bio--data to:
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th FEBRUARY 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**